मौनाच्या धुक्यात कलम १८

ब्राह्मणी उपाध्यांचे घटनात्मक अस्तित्व

केवळ दैनंदिन सामान्य जीवनातच नाही तर अगदी सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीतही दिसून येते की, ज्येष्ठ व्यक्तींना 'सर' किंवा 'मॅडम' म्हणण्याचा प्रघात आहे. पण या उपाध्यांमधील श्रेष्ठतेची मानसिकता घटनेतील कलम १८ नुसार गैर ठरते. म्हणजे एखाद्याला अगदी नावाने हाक मारल्याने फारसे बिघडत नाही पण 'सर', 'मॅडम' यांसारख्या उपाधी लावून बोलण्यातून मात्र आपण असमानता जपत असतो...

दीपक कसाळे
dniipmuu30@gmail.com

भारतीय संविधानातील कलम १८ हे 'उपाधींचे निर्मूलन' या नावानेच ओळखले जाते. या कलमाचा मुख्य उद्देश असा आहे की, भारतात कोणालाही, त्यांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय किंवा धार्मिक स्थानामुळे इतरांपेक्षा विशेष श्रेष्ठत्व प्राप्त होऊ नये. ब्रिटिश काळात 'सर', 'रायबहादूर', 'नवाब', 'खानबहादूर' अशा उपाध्या दिल्या जात असत, ज्या व्यक्तीला इतरांपेक्षा वरचढ ठरवत आणि सामाजिक भेद वाढवत. कलम १८ अशा उपाध्यांना कायमचे संपवण्याच्या उद्देशाने निर्माण झालेले आहे.

या कलमानुसार भारत सरकार कोणालाही कोणतीही अशी उपाधी देऊ शकत नाही जी त्याला इतरांपेक्षा वेगळी आणि विशेष मान्यता देईल. मात्र यामध्ये फक्त दोन बाबी अपवाद म्हणून मान्य आहेत. एक– सैनिकी क्षेत्रात मिळणारे सन्मान आणि दोन– शैक्षणिक क्षेत्रात मिळणाऱ्या पदव्या, जसे की एम.ए., पीएच.डी. वगैरे. त्यामुळे 'डॉ.', 'प्रोफेसर', 'कर्नल' अशा प्रकारच्या पदव्या किंवा सन्मान चालू शकतात, पण 'सर' किंवा 'लॉर्ड' यांसारख्या उपाध्या मान्य नाहीत.

असे मानले जाते की, कलम १८ हे भारतीय समाजात समानतेची भावना दृढ करण्यास कायदेशीर आधार देते. लोकशाही व्यवस्थेत प्रत्येक व्यक्ती समान असते, कुणी राजा नाही आणि कुणी दास नाही. म्हणूनच असमानता दर्शवणाऱ्या उपाधी आणि श्रेणी यांच्या विरोधात हे कलम उभे राहते. हे कलम केवळ एक तांत्रिक नियम नसून लोकशाहीचा गाभा असल्याचेही समजले जाते.

अगदी पद्मश्री, पद्मभूषण, भारतरत्न अशा पुरस्कारांना देखील श्रेष्ठतेची 'उपाधी'म्हणून मान्यता नाही. त्यांना केवळ 'राष्ट्रीय सन्मान' म्हणून मान्यता आहे. व्यक्तीच्या नावासमोर किंवा नावामागे हे सन्मान 'उपाधी' म्हणून लावले गेले तर त्यातून सामाजिक असमानतेचा भाव उत्पन्न होऊ शकतो. त्यामुळे अशा वापरास विरोध करणारा एक महत्त्वाचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने १९९६ मध्ये 'बालाजी राघवन विरुद्ध युनियन ऑफ इंडिया' या प्रकरणात दिला आहे.

थोडक्यात, कलम १८ हे असमानता अधोरेखित करणाऱ्या किंवा वर्चस्व सूचक उपाध्या वापरण्यास मज्जाव करते आणि समाजात कुणी श्रेष्ठ वा कुणी कनिष्ठ अशा भावना निर्माण होणार नाहीत याची हमी देते. परंतु तरीही समाजात सरकार, राजे, देशमुख अशा उपाध्या सर्रासपणे मोठ्या 'गर्वाने' वापरल्या जातात आणि 'सर', 'मॅडम' असे संबोधल्या जात असलेल्या प्रागतिक चळवळीतील नेतृत्वांना साधा प्रश्नही पडत नाही की, सामाजिक ओळखीत आपल्याला स्वाभिमान हवा की अहंकार?

जातवर्णाधिकारा संदर्भातील बाबासाहेबांचा इशारा

घटनेतील कलम १८ चे मर्म स्पष्ट करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उपाधी म्हणजे केवळ सन्मान नसून त्यात सामाजिक विषमतेचे मूळ स्रोत आहेत, असा इशारा दिला होता. त्यांच्या दृष्टिकोनाचे समर्थन करत टी. टी. कृष्णमाचारी यांनी ३० नोव्हेंबर १९४८ रोजीच्या घटनासभेतील चर्चेत नमूद केले की, ज्यांनी देशप्रेमातून आपली उपाधी परत केली आहे, त्यांना ही बाब फारच मानहानीच्या परिस्थितीत लोटेल. (Constituent Assembly Debates, 30 Nov 1948). त्यांच्या या विधानातील 'Invidious position' म्हणजेच समाजातील श्रेष्ठ आणि कनिष्ठ अशा मानहानिकारक भेदाची स्थिती. या शब्दप्रयोगाच्या वापरातून आंबेडकरांचा हेतू स्पष्ट दिसतो की, उपाध्या समाजात विषमता निर्माण करतात आणि त्यामुळे त्यांचे समूळ निर्मूलन आवश्यक आहे. त्यामुळेच कलम १८ हे केवळ औपचारिक सन्मानावर नाही, तर जातवर्णाधिष्ठित असमानतांवरही प्रतिबंध करण्याचा मूलगामी प्रयत्न ठरते.

परंतु असे असले तरी नंतर या कलमात काही अपवाद ठेवण्यात आले. 'शैक्षणिक पदव्या आणि लष्करी सन्मान' (academic or military distinction) या प्रकारातील पदव्या आणि सन्मान या नाहीशा केल्या जाणाऱ्या उपाध्यांना अपवाद केल्या गेल्या. पुढे अपवादाची नेमकी हीच सापट

ब्राह्मणी वर्चस्वाशी संबंधित सांस्कृतिक उपाध्यांच्या कायदेशीर टिकावासाठी उघडपणे वापरली गेली. उदाहरणार्थ- 'पंडित', 'आचार्य', 'स्वामी' यांसारख्या उपाध्या की, ज्या प्रत्यक्षात जातवर्णाधारित श्रेष्ठत्वाचे प्रतीक आहेत आणि त्या शैक्षणिकतेच्या मुखवट्याखाली घटनात्मक संरक्षण घेऊन आजही रूढ आहेत. असे घटनात्मक संरक्षण राजे, सरदार, देशमुख आदी उपाध्यांना नाही.

कलम १८ च्या मूळ आशयातच वर्चस्वाची पुनर्रचना

कलम १८ चा उद्देश केवळ ब्रिटिश राजवटीतील 'सर', 'रायबहादूर', 'खानबहादूर' अशा औपचारिक उपाध्यांवर बंदी घालणे हा नव्हता. तर प्राधान्याने भारतीय समाजरचनेतील पारंपरिक सत्ताकेंद्रांची मोडतोड करणे हाही होता. घटनेतील कलम १८ मधून उपाधी निर्मूलन करण्याचा प्रस्ताव ठेवताना, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उपाध्यांचे सामाजिक स्वरूप केवळ मान-सन्मानापुरते न मानता त्या सामाजिक सत्तेचे प्रतीक आणि विषमतेचा स्रोत असल्याचे स्पष्टपणे सूचीत केले होते. 'उपाध्यांमुळे समाजात कृत्रिम श्रेष्ठत्वाची निर्मिती होते आणि ती लोकशाहीला बाधक ठरते'अशी त्यांची भूमिका होती-हे त्यांच्या वेळोवेळीच्या बोलण्यातून आणि मसुद्याच्या रचनेतून अधोरेखित होते (Constituent Assembly Debates, 1948; Krishnamachari, 30 Nov 1948). मात्र नंतरच्या मसुदा लेखनात 'शैक्षणिक पदव्या आणि लष्करी सन्मान' यांचा अपवाद ठेवला गेल्याने पुढे त्याचाच विस्तार होत, जातवर्णाधारित सामाजिक प्रतिष्ठेच्या प्रतीक असलेल्या उपाध्या चक्क 'शैक्षणिक' या वर्गवारीखाली 'सहजच' कायम राहिल्या! अशा अपवादातूनच समाजातील ब्राह्मणी वर्चस्व नव्या संदर्भात पुनर्रचित होत असते आणि पुन्हा विशिष्ट जातीचे बौद्धिक आणि सांस्कृतिक वर्चस्व नव्या संदर्भातही टिकवले जाते.

ब्राह्मणी वर्चस्वाधारित उपाध्यांचे ऐतिहासिक स्वरूप

खरे तर 'पंडित', 'आचार्य', 'स्वामी' अशा उपाध्या शैक्षणिक ज्ञानीपणाचे प्रतीक असण्याऐवजी प्राचीन भारतातील जातवर्णव्यवस्थेतील ब्राह्मणी सत्तेच्या बौद्धिक एकाधिकाराचे प्रतीक राहिलेल्या आहेत. 'पंडित' हा शब्द संस्कृत भाषेतील 'पण्ड'या धातूपासून आला असल्याचे सांगितले जाते. 'पण्ड' म्हणजे ज्ञान देणे, शिकवणे, उपदेश करणे. अर्थात पंडित म्हणजे ज्याच्याकडे वेद-शास्त्रज्ञान आहे तो उपदेशक,वेदज्ञ (संदर्भ: Monier-Williams Sanskrit Dictionary,1899). याचा अर्थ असा होतो की, पंडित या शब्दाचा वापर वेद, स्मृती, आणि धर्मशास्त्रांचे पारंपरिक ब्राह्मण अभ्यासक यांच्यासाठी होत होता. तर 'आचार्य' म्हणजे धार्मिक आणि सामाजिक आचार शिकवणारा शास्त्रज्ञ किंवा गुरू. विशेषतः वेद, धर्मशास्त्र, कर्मकांड आणि आचारसंहिता यांमध्ये पारंगत व्यक्ती अशी मोनियर-विलियम्स संस्कृत डिक्शनरीतली व्याख्या आहे. तर स्वामी या शब्दाबद्दल हीच डिक्शनरी म्हणते की, 'स्वामी' म्हणजे मालक, प्रभू, अधिपती, किंवा गुरू, जो इतरांवर मालकी किंवा अधिकार गाजवतो; विशेषतः आध्यात्मिक किंवा सामाजिक क्षेत्रात. गुरुशिष्य परंपरेत 'श्रेष्ठ' आणि 'अधिपती' अशा अर्थानेही ही उपाधी वापरली जाते. यातून हे स्पष्ट होते की, या उपाध्या शैक्षणिक पात्रतेच्या अर्थाने प्रचलित नसून, ब्राह्मणी परंपरेनुसार सांस्कृतिक वर्चस्वाच्या प्रतीक आहेत.

या उपाध्यांमध्ये शूद्र-अतिशूद्र व्यक्तींना प्रवेश नव्हता. त्यामुळे कुणी कितीही त्या शैक्षणिक उपाध्या असल्याचे म्हटले, तरी भारतीय सामाजिक स्मृती आणि सांस्कृतिक गाभ्यात त्यांचा संबंध अजूनही ब्राह्मणी वर्चस्वाशीच राहिलेला आहे.

फुले, आंबेडकरांचे वर्चस्व सूचक उपाध्यांवरील आक्षेप

जातवर्ण आधारीत सामाजिक संरचनेच्या दृष्टिकोनातून विचार केला तर फुले आणि आंबेडकर या दोघांनीही या उपाध्यांच्या सांस्कृतिक, सामाजिक मांडणीवर कठोर टीका केली आहे. फुल्यांनी 'गुलामगिरी' (१८७३) मध्ये ब्राह्मण धर्मशास्त्रज्ञांचा, विशेषतः 'पंडितां'चा जोरदार उपहास केला आहे. त्यांच्या मते, पंडित हे केवळ मनूच्या विधानामुळे श्रेष्ठ ठरलेले होते, ज्ञानामुळे नव्हे. सत्यशोधक चळवळीत फुल्यांनी 'पंडित', 'पुरोहित' यांसारख्या उपाध्यांना विरोध करून 'सज्जन', 'सत्यशोधक' अशा जातवर्णमुक्त पर्यायी ओळखी देण्याचा प्रयत्न केला.

डॉ. आंबेडकरांनी त्यांच्या चिंतनात वारंवार ज्ञानाधिकाराच्या जातीय रचनेवर हल्ला केला आहे. 'nnihilation of Caste' (1936) ते लिहितात, The Brahmin is the only intellectual class in India and the intellectual class is the most conservative class. (Ambedkar, 1936) या विधानात त्यांची बौद्धिक मक्तेदारीविषयी स्पष्ट भूमिका घेतल्याचे दिसते.'आचार्य'

कलम १८चा उद्देश केवळ ब्रिटिश राजवटीतील 'सर', 'रायबहादूर', 'खानबहादूर' अशा औपचारिक उपाध्यांवर बंदी घालणे हा नव्हता. तर प्राधान्याने भारतीय समाजरचनेतील पारंपरिक सत्ताकेंद्रांची मोडतोड करणे हाही होता. घटनेतील कलम १८ मधून उपाधी निर्मूलन करण्याचा प्रस्ताव ठेवताना, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उपाध्यांचे सामाजिक स्वरूप केवळ मान–सन्मानापुरते न मानता त्या सामाजिक सत्तेचे प्रतीक आणि विषमतेचा स्रोत असल्याचे स्पष्टपणे सूचीत केले होते. 'उपाध्यांमुळे समाजात कृत्रिम श्रेष्ठत्वाची निर्मिती होते आणि ती लोकशाहीला बाधक ठरते' अशी त्यांची भूमिका होती–हे त्यांच्या वेळोवेळीच्या बोलण्यातून आणि मसुद्याच्या रचनेतून अधोरेखित होते.

आणि 'पंडित' ही सांस्कृतिक संज्ञा या मक्तेदारीचे प्रतीक आणि पहारेकरी म्हणून कार्यरत होती, असा अर्थ त्यांच्या एकूण वैचारिक भूमिकेतून (विशेषतः Revolution and Counter-Revolution in Ancient India) सूचित होतो.त्यामुळे ही रचना केवळ सामाजिक नव्हे, तर बौद्धिक आणि सांस्कृतिक सत्ता–नियंत्रणाचे माध्यम होती आणि तिने घडवलेल्या 'आचार्य', 'पंडित' अशा ब्राह्मणी उपाध्या म्हणजे शूद्र–अतिशूद्र जनतेला ज्ञानाच्या क्षेत्रात प्रवेश नाकारणारी प्रतीके होती.

जातवर्णाधिकारचे सांस्कृतिक पुनरुत्पादन

या समस्येवर सर्वोच्च न्यायालयात आजवर साधी याचिकाही दाखल झालेली नाही. त्यामुळे साहजिकच 'पंडित', 'आचार्य', 'स्वामी' यांसारख्या उच्च जातवर्चस्व दर्शक उपाध्यांची कसलीही घटनात्मक समीक्षा झालेली नाही. या जातवर्णाधिष्ठित उपाध्या आजही न्यायालयीन समीक्षेच्या बाहेर आहेत. म्हणजेच त्या ना 'राजमान्य' आहेत, ना स्पष्टपणे निषिद्ध! त्यामुळे त्या आजही उच्च जातीय सामाजिक प्रतिष्ठा टिकवण्यासाठी सुरक्षित असा कायदेशीर मार्ग ठरत आहेत.

जातवर्णाधारित सांस्कृतिक पुनरुत्पादनाच्या सामाजिक प्रक्रियेचे शास्त्रीय विश्लेषण फ्रेंच समाजशास्त्रज्ञ जेफरलॉट क्रिस्तोफ यांनी 'India's Silent Revolution: The Rise of the Lower Castes in North India' (2003) या ग्रंथात केले आहे. ते स्पष्टपणे सांगतात की, भारतातील वर्चस्वशाली जातींनी आपली सत्ता केवळ राजकीय किंवा आर्थिक क्षेत्रात नव्हे, तर सांस्कृतिक क्षेत्रातही टिकवून ठेवली आहे. त्यांनी हे विश्लेषण करताना असे नमूद केले की,वरच्या जातींचे सांस्कृतिक वर्चस्व टिकून आहे, ते भाषा, धार्मिक विधीतील भूमिका आणि धार्मिक अथवा शैक्षणिक म्हणून वैध ठरवल्या जाणाऱ्या सन्मानसूचक उपाध्यांद्वारे, पण त्या उपाध्या मुळात इतरांना वगळणाऱ्या (exclusionary) असतात.

तर पियेर बुरदिऊयांनी सांगितले की, प्रतिष्ठासूचक उपाध्या (honorific titles) हे भाषिक भांडवलाचे तुकडे आहेत, जे उच्चभ्रू वर्गाला समाजात प्रतीकात्मक सत्ता (symbolic power) मिळवून देतात. या उपाध्या समाजात भाषेतील सत्तेची ओळख झाकून टाकतात (misrecognition) आणि त्यामुळे 'पंडित', 'आचार्य', 'स्वामी' यांसारख्या उपाध्या सामान्य किंवा नैसर्गिक वाटू लागतात, आणि त्यामागील सत्ता–संरचना मात्र अदृश्य होते. बुरदिऊच्या मते, अशी संबोधने मुळातच समाजात भेदभाव टिकवून ठेवणारी प्रतीके आहेत, कारण त्यांच्याकडून शोषण केल्या जाणाऱ्या लोकांनाही त्या उपाध्या योग्य वाटू लागतात आणि ते एका अर्थाने स्वतःच्या हक्कांनाच चूड लावतात. (Bourdieu 1991).

वरील विश्लेषण दर्शवते की, भाषिक अंशतत्त्वाच्या गैर–मान्यतेतून (misrecognition) वर्चस्वसूचक उपाध्यांचे नैसर्गिकीकरण केले जाते आणि त्यातून उच्चजातीय सत्तेचे सांस्कृतिक पुनरुत्पादन होत राहते.

न्यायशास्त्रीय मौनाचे धुके

कलम १८चा उद्देश सामाजिक सत्तेतील विषमता दूर करणे हा होता. बाबासाहेब आंबेडकरांनी उपाध्यांमधून होणाऱ्या सामाजिक श्रेष्ठत्वाच्या राजकारणाची चिरफाड केली होती. पण संविधानाच्या अंमलबजावणीत आणि न्यायिक विश्लेषणात ब्राह्मण वर्चस्वाधारित सांस्कृतिक उपाध्यांवर कठोर समीक्षा करण्यात आली नाही. परिणामी त्यांना 'शैक्षणिक' किंवा 'धार्मिक' या अपवादांच्या नावाखाली कायदेशीर संरक्षण मिळाले.

सरदार, वतनदार, कुलकर्णी, देशमुख आदी राजमान्य उपाध्यांचे कलम १८ नुसार उच्चाटन करण्यात आले, परंतु खुद्द राजमान्यताच ज्या ब्राह्मणी धर्माच्या मान्यतेवर अवलंबून होती त्या ब्राह्मणमान्यतेला कलम १८ ने स्पर्शच केला नाही! खरे

तर भारतीय सामाजिक व्यवस्थेत 'ब्राह्मणमान्यता' ही 'राजमान्यतेपेक्षा' अधिक खोल, शाश्वत आणि निर्णायक मानली जात होती. इथे राजाही ब्राह्मणमान्यतेच्या आधारावर वैध किंवा अवैध ठरवला जात होता. राजा हा धर्माचा संरक्षक (धर्मपालक) मानला गेला होता, पण धर्माचा निर्माता नव्हे! धर्मशास्त्रात (मनुस्मृती, याज्ञवल्क्यस्मृती इ.) अगदी स्पष्ट आहे की, ब्राह्मणांचे राजावरही वर्चस्व होते. राजा चुकला, तर त्याला ब्राह्मणांनी शिक्षा करावी असे धर्मशास्त्र सांगत होते. एखादी व्यक्ती राजाही तेव्हाच बनू शकत होता जेव्हा त्याला ब्राह्मण पंडितांकडून अभिषिक्त केले जाई. म्हणजेच, राजालाही ब्राह्मणमान्यता अनिवार्य होती. जातवर्ण समाजात ब्राह्मण हे पद जन्मसिद्ध आणि शाश्वत असून राजपद मात्र प्राप्त होणारे आणि काहीसे नशिबावर अवलंबून होते. त्यामुळे भारतीय समाजात ब्राह्मणमान्यता सर्वोच्च आणि राजसत्ता ही ब्राह्मणी अधिसत्तेच्या अधीन होती.

भारतीय समाजाची केवळ जाणीवच नव्हे तर नेणीवही ब्राह्मणी अधिमान्यतेने प्रभावित असल्यामुळे विषमता दर्शक ब्राह्मणी उपाध्या 'सहजच' स्वीकारल्या जातात. पाटील आणि पंडित या शब्दांचे ऐतिहासिक भाषिक संक्रमण पाहिले तर दिसते की, पाटील शब्दाचा बदलत गेलेला अर्थ- वैदिक/संस्कृत काळात पत्तलिक म्हणजे गावप्रमुख अधिकारी, प्राकृत काळात पाटील म्हणजे भूभागाचा अधिकार असलेला, मध्यकाळात पाटील म्हणजे महसूल आणि गाव कारभार प्रमुख, तर आधुनिक काळात आडनाव किंवा सामाजिक ओळख असा दिसतो. तर पंडित या शब्दाचा बदलत गेलेल्या अर्थ- वैदिक/संस्कृत काळात पण्डित म्हणजे विद्वान-शास्त्रज्ञ-ज्ञानात पारंगत, प्राकृत काळात पंडित म्हणजे ज्ञानी-अभ्यासू, मध्यकालीन मराठीत वेद-धर्मशास्त्र वाचणारा-ब्राह्मण विद्वान, तर आधुनिक मराठीत ज्ञानी व्यक्ती (सामान्यतः ब्राह्मण) असा होतो. म्हणजे ब्राह्मणी ज्ञानसत्तेच्या सूचक असलेल्या 'पंडित' सारख्या उपाध्यांची जाणीव-नेणिवेतील गैर-मान्यता (misrecognition) शेकडो वर्षांच्या ब्राह्मणी अधिमान्यतेची ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेले भाषिक वास्तव आहे. त्यामुळे सामाजिक पर्यावरणात भिनलेल्या विषमतादर्शक संकल्पनांचे सत्य आकळण्याची समजच मुळात बाधित झालेली असून, या न्यायशास्त्रीय मौनाच्या धुक्यात कलम १८ ही धूसर झालेले आहे.

त्यामुळे आपण असे म्हणू शकतो की, पंडित, आचार्य, स्वामी यांसारख्या उपाध्या आजही केवळ उपाध्या नसून, ब्राह्मणी वर्चस्वाचे ते आजचे सामाजिक, सांस्कृतिक, आणि कायदेशीर रूप आहे. हे रूप राज्यघटनेतून व्यक्त झालेल्या समतेच्या मूलभूत तत्त्वालाच बाधा पोहोचवत असून सामाजिक समतेसाठीचे आजचे प्रश्न हे केवळ भाषिक अथवा सांस्कृतिक स्वरूपापुरते मर्यादित नाहीत. तर ते काटेकोरपणे राजकीय आणि घटनात्मक हस्तक्षेपाचेही आहेत.

***

लेखक हरिती पब्लिकेशनच्या माध्यमातून वाचन चळवळीचे काम करतात, तसेच सत्यशोधक बहुजन आघाडीचे राज्य संघटक आहेत.

संदर्भः

- Ambedkar, B. R. (1936). Annihilation of Caste. (S. Anand, Ed., Critical edition). Navayana.
- Bourdieu, P. (1991). Language and symbolic power (J. B. Thompson, Ed.; G. Raymond & M. Adamson, Trans.). Harvard University Press.
- Constituent Assembly of India. (1948). Constituent Assembly Debates, Vol. VII. Retrieved from https://cadindia.clpr.org.in/
- Jaffrelot, C. (2003). India's silent revolution: The rise of the lower castes in North India. Columbia University Press.
- Monier-Williams, M. (1899). A Sanskrit-English dictionary. Oxford University Press. Retrieved from https://www.sanskrit-lexicon.uni-koeln.de/
- Omvedt, G. (1994). Dalits and the democratic revolution: Dr Ambedkar and the Dalit movement in colonial India. Sage Publications.
- Phule, J. (1873). Gulamgiri [Slavery] (G. P. Deshpande, Trans., 2002 ed.). Critical Quest.
- Raju, M. P. (2002). Constitutional rights of Scheduled Castes. Indian Social Institute.
- Supreme Court of India. (1996). Balaji Raghavan & Ors. v. Union of India, AIR 1996 SC 770.